ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १९ जानेवारी, १९५५ | अंक ३

## विविध माहिती

**टेलिफोन बंद पाडणारें हास्य**—कोपनहेगन येथील एका स्त्रीला टेलिफोनवर हसण्याची बंदी करण्यांत आली आहे. कारण ह्या स्त्रीच्या हास्यानें टेलिफोनची तार नादुरुस्त होते असें आढळून आलें आहे. ह्या बाईचा टेलिफोन अनेकदां बदलण्यांत आल्यानंतरहि हाच प्रकार होऊं लागला. टेलिफोनच्या कारखान्यांत बाईच्या आवाजाची चांचणी घेऊनहि कांहीं कारण सांपडलें नाहीं.

**फ्रान्समधील दारूविरोधी मोहीम**—फ्रान्सचे मुख्य प्रधान मि. मेंडेस फ्रान्स ह्यांनीं पुरस्कारिलेल्या मद्यविरोधी मोहिमेला पाठिंबा देण्यासाठीं फ्रेंच सरकार नवे उपाय योजणार आहे. औषधासाठीं दिलेल्या दारूच्या परवान्याचा दुरुपयोग केल्यास जबर शिक्षा ठेवण्यांत येणार आहे. मद्यार्क नसणारीं पेयें तयार करण्यास उत्तेजन देण्यांत येणार आहे आणि फळांच्या रसावरील कर कमी करण्यांत येणार आहे.

**रशिआंत रंगीत टेलिव्हिजन**—सोव्हिएट रशिआचे रेडिओविषयक मंत्री मि. कालयामिकॉव्ह ह्यांनीं असें जाहीर केलें कीं, रशिआंत नैसर्गिक रंगांत टेलिव्हिजन चालू करण्याचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. नव्या प्रकारचे टेलिव्हिजन सेट्स लवकरच मॉस्कोमध्यें बसविण्यांत येतील, असेंहि ते म्हणाले.

**बलसाड येथें साखरेचा कारखाना**— सुरत जिल्ह्यांतील कांहीं गांवकऱ्यांच्या मदतीनें बलसाड येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुंबई सरकार १० लाख रुपयांचें भांडवल गुंतविणार असून मध्यवर्ती सरकार ३५ लाख रुपयांचें कर्ज देणार आहे अशी वार्ता आहे. लोकांकडून १५ लाख रुपये जमविण्यांत येणार आहेत.

**उत्तर-प्रदेश सरकारचे अनुबोधपट**—चालू वर्षी उत्तर-प्रदेश सरकारनें ३६ निरनिराळ्या विषयांवर अनुबोधपट काढण्याचें ठरविलें आहे. हा कार्यक्रम पुरा झाला तर ह्या बाबतींत राज्य-सरकारचा पहिला नंबर लागेल. राज्यांतील विकासाच्या योजना आणि सांस्कृतिक विषय ह्यांना प्राधान्य देण्यांत आलें आहे. चित्रपटांसाठीं ५ लाख रुपयांपेक्षाहि अधिक खर्च येईल.

**हिमालय प्रदेशांतील वीज-पुरवठा**—हिमाचल-प्रदेशांतील खेड्यांना विजेचा पुरवठा करण्याचें काम चालू झालें आहे. जानेवारीच्या १ तारखेपासून सुंदरनगर ह्या ३,००० लोकवस्तीच्या गांवाला विजेचा पुरवठा सुरू झाला. विजेचा वापर घरगुती उपयोगासाठीं व ग्रामोद्योगासाठीं करण्यांत येत आहे. राज्य-सरकारनें वीज-पुरवठा करणाऱ्या ११ योजना तयार केल्या आहेत. सर्वांना मिळून १·२० कोटी रुपये खर्च येईल.

**विद्यार्थ्याचें यशस्वी परिश्रम**—आंध्र राज्यांतील जिल्ह्यांत वेरिल धातूच्या साठ्याचा शोध लावल्याबद्दल श्री. मोहिउद्दीन ह्या आंध्र विद्यापिठांतील विद्यार्थ्याला ४०० रुपयांचें बक्षिस देण्यांत आलें आहे. ह्या धातूचे जे माहीत असलेले साठे राज्यांत आहेत त्यांच्यापासून ५० मैल अंतरावर दूर नवा साठा सांपडला आहे.

**महाभारताचें चिनी भाषांतर**— भारतीय सरकारच्या प्रेरणेनें महाभारताचें चिनी भाषांतर करण्यांत येत आहे. त्याशिवाय इतर कांहीं अभिजात भारतीय ग्रंथ आणि टागोरांचे कांहीं ग्रंथ ह्यांचेंहि भाषांतर करण्यांत येणार आहे. कालिदासाच्या शाकुंतलाचें भाषांतर पूर्ण होत आलें आहे.

**पंचमहालमध्यें नवें वीजकेंद्र**— पंचमहाल जिल्ह्यांतील फ्रीलँडगंजमधील रेल्वे-वसाहतींत एक नवें वीज-निर्मितीचें केंद्र बांधण्यांत येत आहे. तें बहुधा येत्या मार्चमध्यें विजेचा पुरवठा करूं लागेल असा अंदाज आहे. वीज-निर्मितीचें केंद्र बांधण्यासाठीं २८·२५ लाख रुपये खर्च येईल.

**सीलोनमधील परकीय भांडवल**—१९५४ च्या जूनअखेर जीं सहा वर्षें पुरीं झालीं त्या काळांत सीलोनमधील परदेशीय भांडवल १५·९३ कोटी रुपयांनीं कमी झालें; ह्या काळांत सीलोनमधून ३०·७७ कोटी रुपये भांडवल स्वदेशीं परत करण्यांत आलें आणि १५·६४ कोटी रुपये नवें परदेशी भांडवल देशांत आलें. ह्या उलाढालींत ब्रिटनचा वांटा सर्वांत अधिक आहे.

**अंदमानांत जाणारीं शेतकरी कुटुंबें**—अंदमानांतील वसाहत वाढविण्याची जी योजना भारतीय सरकारनें आंखली आहे तीप्रमाणें केरळमधील आणखी ९० शेतकरी कुटुंबें बेटांत धाडण्यांत येणार आहेत. ६० कुटुंबांचा पहिला गट फेब्रुआरी महिन्यांत तिकडे जाण्यास निघेल.

**साडीच्या लोभाची जादू**—उदयपूरपासून जवळ असलेल्या एका डोंगरांतील खेड्याच्या स्त्रियांनीं आपली पडदा पद्धति सोडून दिली आहे. कलकत्ता येथील एका गृहस्थानें खेड्यांत जाऊन असें जाहीर केलें कीं ज्या स्त्रिया पडदा सोडून देतील त्यांना एकेक साडी भेट म्हणून देण्यांत येईल. साड्यांचा लोभ सुटून ४६० स्त्रियांनीं आपला पडदा फेकून दिला असें कळतें.

**हैद्राबादमधील पाटबंधाऱ्यांचीं कामें**—हैद्राबाद सरकारनें राज्याकरितां तयार केलेल्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ६० छोट्या पाटबंधाऱ्यांच्या कामाचा समावेश केला आहे. ह्या सर्व कामांसाठीं मिळून सुमारें २२·७ कोटी रुपये खर्च येईल. एकूण कामांपैकीं १२ कामें राज्याच्या मराठी-भाषिक भागांसाठीं आहेत. ह्या कामांवर ९१८ लाख रुपये खर्च होतील.

## लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्यूझियमचें भवितव्य

पुणें येथील लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्यूझियमचे क्युरेटर श्री. भा. वि. घारपुरे हे नुकतेच मृत्यु पावल्यामुळें त्यांची जागा योग्य प्रकारें भरण्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे. श्री. घारपुरे ह्यांच्या निष्ठेचा, कार्यक्षमतेचा, तन्मयतेचा व ध्येयवादाचा क्युरेटर म्युझियमला लाभेलच, असें सांगतां येत नाहीं; पण म्युझियमच्या कार्याशीं तन्मय झालेला व श्री. घारपुरे ह्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा मिळालेला लायक मनुष्य म्युझियमचें कार्य उत्कृष्ट रीतीनें चालवूं शकेल, ह्यांत संशय नाहीं. इतर ठिकाणचे म्युझियम व लॉर्ड रे औद्योगिक म्युझियम ह्यांचेमध्यें अत्यंत महत्त्वाचा फरक आहे आणि ह्या म्युझियमच्या अनेक शैक्षणिक उपक्रमांनीं त्याला पुण्याच्या शिक्षणविषयक क्षेत्रांत विशिष्ट महत्त्वाचें स्थान प्राप्त करून दिलेलें आहे. पाश्चात्य देशांतील म्युझियम्सच्या कार्यपद्धति आपल्या म्युझियममध्यें उतरविण्याचा श्री. घारपुरे ह्यांचा सतत प्रयत्न असे; त्यांच्या साहाय्यकांनीं त्यांना ह्या प्रयत्नांत केलेली मदत बाहेरील लोकांना समजूं शकणारी नसली, तरी ती विसरली जाता कामा नये. नव्या क्युरेटरकडून कोणत्या लायकीची व कामाची अपेक्षा करावयाची, हें ठरवितांना पूर्वी काम केलेल्यांचा अनुभव आणि कार्यक्षमता हींहि लक्षांत घेणें अगत्याचें ठरेल. लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक म्युझियमच्या लौकिकांत भर टाकील, असाच नवा क्युरेटर येईल व त्याची नियुक्ति करतांना जाणतेपणानें खऱ्या योग्यतेच्या मनुष्याचीच निवड केली जाईल, अशी आम्हांस आशा आहे. श्री. घारपुरे हे म्युझियमच्या पुढील व्यवस्थेबद्दल सल्ला देण्यास सर्वांत योग्य झाले असते. परंतु त्यास आतां इलाज नाहीं. भारतांतील वैशिष्ट्यपूर्ण व अग्रेसर अशा ह्या म्युझियमच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे व तो सोडवितांना सर्वांगीण विचार केला जाईलच, अशी अपेक्षा आहे. म्युझियम चालू राहणें व त्यांत चैतन्य असणें, आणि त्यानें नव्या नव्या उपक्रमांनीं आपलें उद्दिष्ट यशस्वी रीतीनें पार पाडणें ह्यांत फरक आहे. म्हणूनच, म्युझियमला चिरकालित्व प्राप्त झालेलें असलें तरी त्याचें खरें भवितव्य योग्य क्युरेटरवर अवलंबून राहील, हें उघड आहे.

---

### "कॉंक्रीट वर्कर्स गाइड्स"

वरील नांवाखालीं दि कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडियानें पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत. त्या कॉंक्रीटचा उपयोग करणारांना उपयुक्त आहेत. असोसिएशनच्या पत्त्यावर पत्र पाठवून त्या मागविल्या, तर विनामूल्य पाठविल्या जातात. पत्ता, १, क्वीन्स रोड, मुंबई, असा आहे.

---

### किरात "ग्रंथालय विशेषांक"

रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय परिषदेचें पहिलें अधिवेशन ५-१-५५ रोजीं मुंबई राज्याचे क्युरेटर ऑफ लायब्ररीज, श्री. वाकनीस ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडलें. ही परिषद भरविण्यांत नगर वाचनालय, वेंगुर्लें, ह्या १८७१ सालीं स्थापन झालेल्या जुन्या पण कार्यक्षम व आदर्श संस्थेनें जिल्ह्यांतील इतर संस्थांच्या सहकार्यानें पुढाकार घेतला होता. ह्या निमित्तानें "किरात" साप्ताहिकानें 'ग्रंथालय विशेषांक' काढून ग्रंथालय-चळवळीस उत्कृष्ट साहाय्य केलें आहे.

### हिशेब तपासणीचें काम

"हिशेब तपासणीचें काम हें नेहमीं कटु कर्तव्य असतें, कित्येक वेळेस त्यास छिद्रान्वेषणाचें स्वरूप येतें व त्यामुळें कार्यकारी मंडळ व हिशेबतपासनीस यांच्यांत तेढ उत्पन्न होते. आतांपर्यंत लाभलेले हिशेबतपासनीस आपलें कार्य निस्पृहपणें करीत व हिशेबांतील दोषनिदर्शन मोठ्या सामंजस्यानें करीत म्हणून साधारण सभेपुढें परस्परांचे दोष काढण्यांत वेळेचा अपव्यय जो होत असतो तो झाला नाहीं व उलटपक्षीं सभासदांच्या हितपालनाच्या दृष्टीनें हिशेबांत किंचितहि दोष राहूं न देण्याचा यांचा कटाक्ष असतो. उदाहरणार्थ खालील मजकूर देतां येईल. "श्री. शंकरराव जोशी यांच्या कार्यकालांत एक वर्ष ३६६ दिवसांचें आलें. व्याजाची आकारणीची जंत्री ३६५ दिवसांची असते व नेहमीं त्यावरून व्याजाची आकारणी केली जाते त्याप्रमाणें त्याहि वर्षी केली गेली. यामुळें सभासदांवर व्याजाची आकारणी अधिक बसली. हें त्यांना पटलें नाहीं व त्यांनीं ही आकारणी ३६६ दिवसांची जंत्री स्वतः तयार करून त्याप्रमाणें आकारणी करून घेतली." —महाराष्ट्र ब्राह्मण साहाय्यक पेढी मर्यादित, इंदूर, रौप्यमहोत्सव ग्रंथ.

### "हिलरीज वॉक"

गिव्हसन, नॉर्थ आयलंड, (न्यूझीलंड) येथील सर एडमंड हिलरींच्या म्हात्या घराजवळील एका रस्त्याच्या प्रारंभीं ह्या एव्हरेस्ट विजयी पुरुषाचीं पावलें सिमेंटमध्यें उठविण्यांत आलीं आहेत. ह्या रस्त्यास "हिलरीज वॉक" असें नांव देण्यांत आलें आहे.

---

### बॉंबे स्वदेशी को. स्टोर्स

बॉंबे स्वदेशी को. स्टोर्सला ३० जून, १९५४ अखेर संपलेल्या वर्षी ९२,२१५ रु. नफा झाला. १० रुपयांच्या शेअरवर ७ आणे करमाफ डिव्हिडंड जाहीर झालें आहे.

---

### रोजगारासाठीं २०,००० कोटी रुपये

सध्यांपेक्षा थोड्या वरच्या राहणीस अनुरूप असा भारतांतील सर्वांना रोजगार उपलब्ध करून द्यावयाचा म्हटलें, तर १८,००० ते २०,००० कोटी रुपये खर्चावे लागतील, असें प्लॅनिंग कमिशनचे डेप्युटी चेअरमन, श्री.कृष्णमाचारी हे म्हणाले.

---

### ब्रिटिश स्त्रियांचीं सौंदर्यप्रसाधनें

ग्रेट ब्रिटनमधील शेंकडा २५ स्त्रिया आपल्या चेहऱ्यावर कोणतींच सौंदर्यप्रसाधनें वापरीत नाहींत. सुमारें ५०% स्त्रिया फक्त फेस-पावडर, लिपस्टिक व फाउंडेशन क्रीम ह्यांचाच उपयोग करतात; केवळ ५% स्त्रिया आयब्रो पेन्सिल्सचा अवलंब करतात. २५% स्त्रिया नखें रंगविण्यासाठीं पॉलिश वापरतात. सुमारें १०% स्त्रिया जवळ जवळ नेहेमीं सेंट वापरतात. 'फिनॅन्शिअल टाइम्स' ह्या आर्थिक वृत्तपत्रानें पहाणी करून ही आकडेवारी प्रसिद्ध केली आहे.

---

### देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

वरील बँकेनें १९५४ मध्यें प्रगति केली आहे. शाखांची संख्या ५९ ची ६२ झाली. गिऱ्हाइकांच्या खात्यांची संख्या ८५,००० वरून ९६,००० वर गेली. ठेवींची रक्कम १२·५६ कोटी रु. झाली. निव्वळ नफा ८·८४ लक्ष रु. झाला; १९५३ मध्यें तो ६·९१ लक्ष रु. होता. प्रत्येक ऑर्डिनरी भागास २ रु. डिव्हिडंड मिळणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १९ जानेवारी, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आर्थिक वर्षाचा प्रारंभ

सध्यांचें आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च, असें आहे. तें बदलून, अधिक सोईचे १२ महिने घ्यावेत, अशी नियोजन-मंडळाची शिफारस आहे. त्यादृष्टीनें राज्य सरकारांची मतें मागविण्यांत आलीं आहेत. ऑगस्ट ते जुलै, अशी बारामाही सुचविली जाण्याचा संभव आहे. ऑगस्टला नवें वर्ष सुरू करणें गैरसोईचें झालें, तर तें ऑक्टोबरला सुरू करावें, अशीहि सूचना आहे.

सध्यांचें आर्थिक वर्ष ब्रिटिश सरकारनें ठरविलेलें असून, ग्रेट ब्रिटनमधील आर्थिक वर्षाचें तें अनुकरण आहे. भारतांत, वर्षारंभ एप्रिलमध्यें होणें गैरसोईचें आहे, कारण अंदाजपत्रकांतील खर्चास मंजुरी मिळाल्यानंतर खर्चाच्या योजना प्रत्यक्ष अंमलांत येण्यास दोन महिने लागतात. शेतकऱ्यांकडून वसूल करावयाचा महसूलहि तात्काळ हातीं येत नाहीं. मार्च अखेर बजेट मंजूर होतें, त्यांतील तपशील संबंधित अधिकाऱ्यांच्या हातीं येण्यास महिना-दीड महिना लागतो. त्यानंतर टेंडर्स बोलाविणें, तीं पास करणें व काम सुरू करणें; पण त्यापूर्वीच पावसाळयास प्रारंभ होतो आणि तीन चार महिने कामास गति प्राप्त होऊं शकत नाहीं. दिवाळीच्या सुमारास कामें जोरानें सुरू होतात, आणि जानेवारी महिना आला कीं पुढच्या वर्षाच्या अंदाजपत्रकाची तयारी सुरू होते. ह्यामुळें, कांहीं कामें अपुरीं रहातात, तर मंजुरी मिळालेला पैसा खर्चा पडतच नाहीं. ऑगस्ट-जुलै असें हिशेबाचें वर्ष केलें, तर ह्या सर्व अडचणी दूर होतील, असें सांगण्यांत येत आहे.

### शेड्यूल्ड व बिगर शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी व त्यावरील व्याजाचे दर

( जून, १९५४ अखेर; आकडे लक्ष रुपयांचे )

| व्याजाचा | शेड्यूल्ड बँका | | बिगर-शेड्यूल्ड बँका ( कांहीं नमुने ) | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | एकूणशी % | रक्कम | एकूणशी % | रक्कम | एकूणशी % |
| ० % | २३२,६७ | २७.२७ | ३,२८ | ८.९३ | २३५,९५ | २६.५२ |
| ०% ते ½% | १४२,३० | १६.६८ | ६१ | १,६६ | १४२,९१ | १६.०६ |
| ½% पेक्षा ज्यास्त ते १% | ९१,९६ | १०.७८ | ३,४४ | ९.३७ | ९५,४० | १०.७२ |
| १% ज्यास्त ते २% | ११३,२३ | १३.२७ | ७,२६ | १९.७६ | १२०,५० | १३.५४ |
| २% पेक्षा ज्यास्त ते ३% | २०६,६८ | २४.२३ | १०,९३ | २९.७४ | २१६,६१ | २४.४५ |
| ३% पेक्षा ज्यास्त | ६६,२८ | ७.७७ | ११,२२ | ३०.५४ | ७७,५१ | ८.७१ |
| एकूण | ८५३,११ | १००.०० | ३५,७५ | १००.०० | ८८९,८८ | १००.०० |

एक्सचेंज बँकांना सर्वांत कमी व्याजानें ठेवी मिळतात. त्यांचे खालोखाल प्रमुख शेड्यूल्ड बँका येतात, नंतर इतर शेड्यूल्ड बँकांचा अनुक्रम लागतो आणि बिगर-शेड्यूल्ड बँकांना व्याजाचा दर भारी पडतो.

शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी वाढल्या, तरी ही वाढ २½-३% व्याजाच्या ठेवींतच झाली. त्यापेक्षा कमी व्याजाच्या ठेवींतहि वाढ झाली, तरी त्यांचें प्रमाण फार थोडें होतें. एक्सचेंज बँकांकडील ठेवींपैकी ५७% ठेवींवर त्यांना ½% सुद्धां व्याज द्यावें लागत नाहीं. प्रमुख हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या ( २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या बँकांच्या ) ठेवींपैकी ४७% ठेवी ½% पेक्षा कमी व्याजाच्या आहेत. इतर शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींत हें प्रमाण त्यांच्या आकाराप्रमाणें कमी कमी होत गेलेलें आहे. लहान शेड्यूल्ड बँकांच्या ठेवीचे आंकडे एकत्र केले, तर त्यांच्या ठेवींपैकी ३८% ठेवींवर ३% पेक्षा जास्त व्याज द्यावें लागतें.

### करेगांव येथील सहकारी साखरकारखाना

करेगांव ( जि. अहमदनगर ) येथील साखरकारखान्याची सहकारी सोसायटी नोंदण्यांत आली आहे. तिची पहिली सर्वसाधारण सभा नुकतीच होऊन डॉ. आर. जी. काकडे ह्यांची सोसायटीच्या अध्यक्षपदीं निवड करण्यांत आली. ३४ गांवांतील ५,००० एकर ऊंस ह्या सहकारी कारखान्याच्या कक्षेंत येईल. सोसायटीच्या १,००० सभासदांकडून ५ लक्ष रु. शेअरभांडवल जमलें आहे.

### श्री. राजाध्यक्ष ह्यांचा अहवाल मार्चअखेर पुरा होणार

बँकअवार्डवरचा श्री. राजाध्यक्ष ह्यांचा अहवाल मार्चअखेर सरकारकडे पोंचेल, अशी अपेक्षा आहे. फेब्रुवारीअखेर हें काम पुरें झालें असतें, पण बँकनोकरांनीं चौकशीशीं सहकार्य करण्याचें ठरविल्यामुळें आतां अहवालास थोडा अधिक वेळ लागणार आहे.

### पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेस १९५४ मध्यें ५६.८५ लक्ष रु. नफा झाला आहे. ठेवी ६६ कोटी रु. वरून ७५ कोटी रु. वर गेल्या व खेळतें भांडवल ७९ कोटी रु. वरून ९० कोटी रु. वर गेलें. बँकेनें १९५३ मध्यें आणखी १२ शाखा उघडल्या. एकूण शाखांची संख्या आतां ३१२ झाली आहे.

### इंपीरिअल बँकेची खास सभा

इंपीरिअल बँकेच्या २०० भागीदारांनीं बँकेच्या डायरेक्टर-बोर्डास भागिदारांची खास सभा बोलविण्यास सांगितलें आहे. बँकेचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर भागीदारांना शेअरची जी किंमत दिली जाणार आहे, ती अपुरी आहे, असें भागीदारांचें म्हणणें आहे.

### साबणाच्या उद्योगाच्या चौकशीची मागणी

इंडिअन सोप अँड टॉयलेट मेकर्स असोसिएशन ह्या संस्थेचे अध्यक्ष श्री. नवल टाटा ह्यांनी भारतामधील साबणाच्या व सौंदर्य प्रसाधनाच्या धंद्याची परिस्थिति अभ्यासण्यासाठी चौकशी-मंडळ नेमण्यांत यावें अशी मागणी भारतीय सरकारकडे केली आहे. सध्यां ह्या धंद्याची परिस्थिति बिकट झाली असल्याचें सांगून श्री. टाटा पुढे म्हणाले कीं कांहीं साबणाच्या कारखान्यांना धंदा बंद करण्यासारख्या परिस्थितीला तोंड द्यावें लागत आहे. अशा कारखान्यांना मदत करण्याचा कांहीं मार्ग शोधून काढला नाहीं तर बेकारी आणखी प्रसार पावल्याशिवाय रहाणार नाहीं. धंदा चालू ठेवण्याच्या दृष्टीनें कांहीं उपाययोजना करण्यांत आली नाहीं तर हिंदमधील साबणाची बाजारपेठ संपूर्णपणें परकीय कंपन्यांच्या ताब्यांत जाणाचा धोका उत्पन्न झाला आहे. सरकारनें निवर्गीय समाज-रचना अंमलांत आणण्याचें धोरण ठरविलें आहे. ह्या नव्या समाजांत छोट्या उद्योगधंदेवाल्यांना संरक्षण देण्याचें धोरण सरकार धार्मिकपणानें आचरीत आहे. जितका धंदेवाला छोटा तितकें त्याला संरक्षण अधिक, असें सरकारचें तत्त्व दिसतें. हातमागाचें कापड व गिरण्यांचें कापड, घाण्यांचें तेल आणि तेलाच्या गिरण्यांत तयार होणारें तेल ह्यांचे परस्पर संबंध ठरवितांना सरकारनें वरील तत्त्वाचा अवलंब केलेला दिसून येतो. सरकारचें आर्थिक तत्त्वज्ञान हें असें आहे. अर्थातच साबणासारख्या छोटेखानी स्वदेशी उद्योगधंद्याला सरकारकडून योग्य तें संरक्षण मिळेल अशी आशा करण्यांत अन्याय कांहींच नाहीं. भारताचे व्यापार व उद्योगमंत्री ह्यांना साबणाच्या धंद्याची सर्व माहिती असल्यानें त्यांच्या ज्ञानाचा फायदा धंद्याला होईल, अशी आशाहि त्यांनीं व्यक्त केली.

### नेपा कागदाची गिरणी सुरू झाली

नेपानगर येथील भारताच्या पहिल्या राष्ट्रीय कागदाच्या गिरणींत गेल्या ११ तारखेस उत्पादनाला प्रारंभ झाला आहे उत्पादनासाठी लागणारा रासायनिक लगदा मात्र सध्यां परदेशाहून आयात करण्यांत येणार आहे. सुमारें तीन महिन्यांच्या कालावधींत कारखान्याची संपूर्ण उत्पादनक्षमता वापरांत येईल. तसें झालें म्हणजे रोज १०० टन कागद तयार होईल. देशांत वृत्तपत्रांना जितका कागद दरवर्षी लागतो त्यापैकीं एकतृतियांश कागद हा कारखाना पुरवूं शकेल, आणि त्यामुळें दरवर्षी सुमारें १५० लाख रुपये किंमतीच्या परदेशीय हुंडणावळीची बचत होईल. हा कारखाना मध्यप्रदेशांत सेंट्रल रेल्वेच्या मार्गावरील चांदणी स्टेशनपासून तीन मैलांवर आहे. भारतांत वृत्तपत्राला लागणाऱ्या कागदाचें उत्पादन करणारा हा पहिलाच कारखाना आहे, म्हणून त्याचें महत्त्व आहेच. पण, कागद उत्पादन करण्यांत एका विशिष्ट जातीच्या लांकडाचा ह्या कारखान्यांत प्रथमच उपयोग करण्यांत येणार आहे. ह्या झाडाचा असा उपयोग ह्यापूर्वी कोठें करण्यांत आलेला नाहीं. नेपानगरचा कारखाना उभारण्याच्या कामीं आर्थिक जबाबदारी मध्य प्रदेश सरकारनें घेतली होती. राज्य-सरकारनें ५ कोटी रुपयांचें कर्ज दिलेलें आहे. त्यापैकीं २ कोटी रुपयांची रक्कम मध्यवर्ती सरकारनें दिलेली आहे. कागदाला लागणारा कच्चा माल, बांबू व एकप्रकारचीं झाडें ह्यांच्यापासून बनविण्यांत येणार आहे. दरवर्षी ३०,००० टन बांबू व २२,५०० टन झाडें लागतील असा अंदाज आहे. आक्टोबर, १९५५ पासून कारखान्याला परदेशी रासायनिक लगदाहि लागणार नाहीं.

### पंचवार्षिक कार्यक्रमाला पैशाची टंचाई

दिल्ली येथें नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलची बैठक नुकतीच भरविण्यांत आली होती. चालू म्हणजे पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या शेवटच्या वर्षांत मुक्रर करण्यांत आलेल्या सर्व उप-योजना राज्य-सरकारांनीं पार पाडाव्या असा आदेश कौन्सिलनें राज्य-सरकारांच्या प्रतिनिधींना दिला, असें समजतें. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, बहुतेक सर्व राज्य-सरकारांजवळ योजनेंतील कामें पार पाडण्यासाठी लागणारा पैसा नाहीं. त्यामुळें मध्यवर्ती सरकारकडून आर्थिक मदतीची अपेक्षा तीं करीत आहेत असें समजतें. मद्रासचे अर्थमंत्री श्री. सी. सुब्रह्मण्यम् ह्याविषयीं बोलतांना म्हणाले, कीं येत्या १५ महिन्यांत मद्रास राज्यासाठी मुक्रर करण्यांत आलेलीं सर्व कामें पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. राज्यांत अनेक विकास-योजनांचीं कामें चालू असल्यानें राज्य-सरकारला पैशाची टंचाई भासणार, हें ठरल्यासारखेंच आहे. इतरहि बहुतेक राज्यांची परिस्थिति अशीच आहे. तथापि मद्रासची परिस्थिति थोडीशी निराळी आहे. दोन वर्षांपूर्वी मद्रास राज्याला अवर्षण व दुष्काळ ह्यांचा उपद्रव झाला. त्यामुळें मद्रास सरकारला फार मोठा खर्च आला. दुसरें असें कीं, पंचवार्षिक योजनेमधील कामावर करण्यांत येणाऱ्या खर्चाची रक्कम कांहीं कर बसवून उभारण्यांत यावयाची होती. पण कांहीं कारणांमुळें हे कर बसवितां आले नाहींत. पैसा उभारण्यासाठी कांहीं नवे मार्ग शोधून काढणें आवश्यक आहे, पण कर-चौकशी मंडळाचा अहवाल तयार होऊन त्यांतील शिफारसी कळल्याशिवाय नवे मार्ग उपलब्ध होणें शक्य दिसत नाहीं.

### भारत-रशिया व्यापाराची शक्यता

भारत स्वतंत्र झाल्यापासून परराष्ट्रांशीं होणाऱ्या व्यापाराच्या बाबतींतहि त्याला संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें. देशाची औद्योगिक प्रगति झपाट्यानें घडवून आणण्यासाठी योग्य अटींवर मिळेल त्या देशांकडून आधुनिक यंत्रसाहित्य व तांत्रिक ज्ञान मिळविण्याचें धोरण भारतीय सरकारनें साहजिकच स्वीकारलें. भारताला रशिआकडून औद्योगिक साह्य कितपत मिळूं शकेल हा प्रश्न अलीकडे वादग्रस्त झाला आहे. बिहार चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, श्री. शांतिप्रसाद जैन ह्यांनीं ह्या बाबतींत पुढीलप्रमाणें विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात, कीं भारत आणि रशिआ ह्यांच्या दरम्यान व्यापार होण्यास फारच थोडा वाव आहे. सोव्हिएट रशिआला भारतीय उद्योगपतींचें जे एक प्रतिनिधी मंडळ गेलें होतें, त्यांत श्री. जैन हे होते. त्यांच्या मताप्रमाणें तांत्रिक आणि औद्योगिक दृष्ट्या पाहतां रशिआ अद्याप प. युरोपच्या बराच मागें आहे. रशिआच्या औद्योगिक प्रगतीसंबंधीं बोलतांना ते म्हणाले, कीं इतर देशांपासून धडे शिकावयाचेच असतील तर ते रशिआखेरीज इतर देशांकडूनहि घेण्यासारखे आहेत. सोव्हिएट रशिआपेक्षा भारताचा सामाजिक व नैतिक वारसा अधिक उच्च प्रकारचा आहे. रशिआंतील औद्योगिक मालासंबंधीं बोलावयाचें झाल्यास असें म्हणावें लागेल, कीं त्या देशांत तयार होणाऱ्या मालाचा दर्जा अमेरिकेंत आणि प. युरोपांतील इतर देशांत तयार होणाऱ्या मालापेक्षा बराच कमी असतो. बिहार चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे श्री. जैन ह्यांचा सत्कार करण्यांत आला. त्याप्रसंगीं केलेल्या भाषणांत त्यांनीं हा इषारा दिला आहे

## चेकवरील प्रत्येक चिन्हाला अर्थ असतो !

प्रत्येक बँक आपल्या खातेदारास छापील चेक पुरविते; हा चेक ठराविक नमुन्याचा असतो. तथापि, त्यावर अनेक चिन्हें छापलेलीं असतात. त्यांचा अर्थ समजला तरच त्यांचें महत्त्व कळूं शकेल. एडिंबरो येथील "चेंबर्स जर्नल" मध्यें चेकवरील ह्या चिन्हांची माहिती थोडक्यांत दिली आहे.

चेकचा रंग सुद्धां महत्त्वाचा असतो. रंगीत रेघा किंवा बारीक अक्षरें पांढऱ्या कागदावर छापण्यांत येतात, त्याचा उद्देश लिहिलेलें खोडतां येऊं नये हा असतो. चेकवर क्रॉसिंगच्या रेषा छापलेल्या असल्या, म्हणजे पोस्टानें तो धाडण्यांत धोका नसतो.

प्रत्येक बँक स्वतःच्या चेक्ससाठी एकादा रंग पसंत करते व मग त्याच रंगाचे चेक नेहमी छापून घेते. त्यामुळें केवळ रंगावरूनाहि बँकेचे चेक ओळखतां येणें शक्य होतें.

बँकेचें नांव व शाखेचें नांव हीं अर्थातच चेकवर ठळकपणें छापण्यांत येतात. एकाच शहरांत एकापेक्षा अधिक शाखा असल्या, तर ज्या रस्त्यावर शाखा असेल, त्या रस्त्याचेंहि नांव छापण्यांत येतें.

बहुतेक ब्रिटिश बँकांच्या चेकवर खालच्या डाव्या कोपऱ्यांत C, T किंवा M हीं अक्षरें असतात. चेक्सचें वर्गीकरण केल्यावर ते कोणत्या क्लिअरिंगमध्यें जावयाचे, तें ह्या अक्षरांवरून समजतें. C म्हणजे कंट्री, T म्हणजे टाउन व M म्हणजे मेट्रॉपॉलिटन.

प्रत्येक चेकच्या डाव्या, वरच्या बाजूस एक सहा आंकड्यांची संख्या छापलेली असते. ती त्या चेकचा अनुक्रम नंबर दर्शविते. इतर तपशील अपुरा पडला तरी चेक ओळखतां यावा, हा ह्या नंबराचा उद्देश असतो. बँका खातेदारांना दरमहा हिशेबाचीं स्टेटमेंट्स पाठवितात, त्यांवर नांवाऐवजीं ह्या नंबराचे शेवटचे तीन आंकडे फक्त लिहितात.

हे अनुक्रम नंबर वाढवीत गेले, तर संख्या फारच मोठी होत जाईल. म्हणून, १०,००,००० चा आंकडा पोंचण्यापूर्वी पुनः नव्यानें प्रारंभ करण्यांत येतो. तोच तो आंकडा पुनः येण्यास मध्यें कांहीं वर्षांचा अवधि लोटतो.

ग्रेट ब्रिटनमधील प्रत्येक बँकेला एक नंबर दिलेला आहे, त्याला नॅशनल नंबर असें म्हणतात. प्रत्येक चेकच्या उजव्या बाजूच्या वरच्या कोपऱ्यांत हा नॅशनल नंबर छापलेला असतो. प्रत्येक बँक आपला स्वतःचा नंबर चेकवर ठराविक ठिकाणीं व ठराविक पद्धतीनेंच छापते. नंबराचा पहिला आंकडा किंवा पहिले दोन आंकडे इतर आकड्यांपेक्षा ठळक टाइपांत छापलेले असतात.

चेक्सचें घाईनें वर्गीकरण करतेवेळीं, हे ठळक आंकडे उपयोगी पडतात. पुढचे बारीक टाइपांतील आंकडे बँकेच्या शाखेचें नांव दर्शवितात. हिशेब ठेवण्यास हे आंकडे फार सोईचे होतात. प्रत्येक बँकेजवळ ह्या आंकड्यांचा अर्थ स्पष्ट करणारें एक पुस्तक असतें, त्या पुस्तकांत आकड्यांवरून शाखांचीं नांवें व पत्ते मिळूं शकतात.

कित्येक बँका आणखी एक नंबर चेकवर छापून घेतात. मुख्य कचेरींत क्लिअरिंगमधून चेक आल्यावर ते शाखांकडे पाठविण्यासाठी ह्या नंबराचा उपयोग केला जातो. हें काम त्वरेनें करावें लागतें, पण त्यांत चुका राहून चालत नाहींत. ह्या नंबरापैकीं पहिले आंकडे शाखांचा एक गट दर्शवितात व उरलेले आंकडे वैयक्तिक शाखा निदर्शित करतात. पत्ते आपण प्रथम रंगाप्रमाणें वेगळे काढतो आणि प्रत्येक रंगाच्या पत्त्यांतील पत्ते आपण ओळीनें लावून पहातो, तशाच प्रकारची ही दक्षता असते.

सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
१९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
अधिकृत भांडवल रू. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रू. ७,२७,२००
रिझर्व्ह रू. ६,०६,०००
ठेवी रू. १,२२,०८,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखा: दादर, माहीम, बेळगांव, पुणें

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
पृष्ठसंख्या १६८ } दुसरी आवृत्ति { किं. २॥ रु. ट. ख. ४ आ.
लेखक : श्रीपाद वामन काळे, संपादक, "अर्थ"
" मार्मिक निरीक्षण व नाजूक विनोद "
—र. पु. परांजपे
" सुखी जीवनाची किल्ली; कलात्मक प्रतिपादन "
—ग. वा. मावळणकर
" मनरंजनाबरोबर विचारांत महत्त्वाची भर "
—शं. वा. किर्लोस्कर
" प्रापंचिकाचें चित्ताकर्षक मार्गदर्शन "
—वि. वि. जोशी
" खुबीनें रंगविलेलें कौटुंबिक चित्र "
—इरावती कर्वे
" सुखप्राप्तीच्या कर्मयोगाचे सुबोध धडे "
—ना. सी. फडके
" सुबोध, व्यावहारिक व पटणारें विवेचन "
—इंदिराबाई देवधर
" नव्या पिढीचें उद्बोधक गाईड "
—वि. द. घाटे

**छापखानेवाल्यांची परिषद्**—ऑल इंडिआ प्रिंटर्स कॉन्फ्रन्सचें तिसरें अधिवेशन मद्रास येथें ता. ६ फेब्रुआरीपासून भरणार आहे. ह्यावेळीं, छापण्याच्या कलेविषयींचें एक प्रदर्शनहि भरविण्यांत येणार आहे. 'हिंदू' पत्राचे संपादक, श्री. के. श्रीनिवासन हे परिषदेचे अध्यक्ष आहेत.

**बडोदा संस्थानचे हत्ती**—बडोदा संस्थान मुंबई राज्यांत समाविष्ट करण्यांत आलें त्यावेळीं संस्थानाच्या हत्तीखान्यांत १८ हत्ती होते. आतां त्यांची संख्या अवघी तिनावर आली आहे. हत्तींच्या पोषणासाठी पूर्वी जवळ जवळ २ लाख रुपयांची वार्षिक तरतूद करण्यांत येत असे. आतां अवघे ३,००० रुपयेच मंजूर करण्यांत येतात.

**२,००० वर्षापूर्वीचे घोडे**—रशिआंतील कांहीं पुराणवस्तु शास्त्रज्ञ द. सैबेरिआंतील अलताय पर्वतांत संशोधन करण्यासाठी गेले होते. एका ठिकाणीं उत्खनन करीत असतां त्यांना २,००० वर्षांपूर्वी बर्फांत पुरले गेलेले घोडे सांपडल्याचें समजतें. घोडे पूर्णपणें शाबूत असून त्यांच्यावरील साजहि सुरक्षित आहे.

**आसाममधील वीज-केंद्र**—आसाममध्यें उमत्रु नदीवर एक जलविद्युत्-केंद्र बांधण्यांत येणार आहे. केंद्राच्या उभारणीसाठी १·५ कोटी रुपये खर्च येईल. विद्युत्-गृहासाठी लागणारी यंत्र-सामुग्री व तांत्रिक मदत पुरविण्याचें कॅनडानें मान्य केलें आहे. कॅनडाकडून होणाऱ्या मदतींपैकीं कांहीं मदत कोलंबो योजनेप्रमाणें होईल.

**हैदराबाद फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन**—राज्यांतील उद्योगधंद्यांना आर्थिक मदत देण्यासाठी कॉर्पोरेशन सुमारें ९ महिन्यापूर्वी स्थापन करण्यांत आलें. आतांपर्यंत कॉर्पोरेशननें निरनिराळ्या उद्योगधंद्यांना मिळून १५ लाख रुपयांचीं कर्जे दिलीं आहेत. संस्थेतर्फे मिळणारीं कर्जे मुख्यतः भांडवली स्वरूपाचीं असतात.


म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी ! !

**दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. १,९९,००० |
| ठेवी | रु. ७१,६८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८६,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

वहा अगर अधिक वर्षे रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**

**( शिड्यूल्ड बँक )**

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०

खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर. — श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**नफ्यांत वाढ; डिव्हिडंड कायम**

| | १९५३ | १९५४ |
|---|---|---|
| निव्वळ नफा ( रु. ) | २,८८,८५८ | ३,२४,७२१ |
| गेल्या वर्षीचा शिल्लक नफा रु. | ५८,३७० | ३६,२२८ |
| एकूण ( रु. ) | ३,४७,२२८ | ३,६०,९४९ |
| | **केलेली वाटणी** | **सुचविलेली वाटणी** |
| कराची तरतूद ( रु. ) | १,४७,००० | १,७०,००० |
| रिझर्व्ह फंडांत जमा ( रु. ) | ८४,००० | ७५,००० |
| ५% करमाफ डिव्हिडंड ( रु. ) | ८०,००० | ८०,००० |
| पुढील वर्षासाठी ( रु. ) | ३६,२२८ | ३५,९४९ |

**विजेचीं रेल्वे एंजिनें बनविणार**—रेल्वेचीं विजेचीं एंजिनें तयार करण्याची यंत्रसामुग्री भारतानें मागविली आहे. ती उभारण्यांत आल्यावर भारतीय रेल्वेज स्वतःस लागणारीं विजेचीं एंजिनें देशांतच तयार करूं लागतील. येत्या तीन वर्षांत भारतीय रेल्वेजना लागणारीं वाफेचीं एंजिनें चित्तरंजन येथील कारखान्यांतच तयार होऊं लागतील.

**कॉर्पोरेशनची थकलेली कराची बाकी**—अहमदाबाद कॉर्पोरेशन मालमत्तेवरील कराच्या थकलेल्या बाकीची वसुली करण्यासाठी कडक उपाय योजीत आहे. सुमारें ३५ लाख रुपयांची बाकी थकलेली आहे. त्यापैकी १२ लाख रुपये आतांपर्यंत वसूल करण्यांत आले आहेत. थकबाकी वसूल करण्यासाठी १,५०० तरी वारंटस् काढावीं लागतील, असा अंदाज आहे.

**नांगल येथें खताचा कारखाना**—पूर्व-पंजाबांत नांगल येथें खताचा कारखाना काढण्याचें ठरलें आहे, अशी माहिती राज्य-सरकारच्या सार्वजनिक बांधकाम-मंत्र्यांनीं सांगितली. नांगल येथें विजेची निर्मिति करणारे प्रत्येकीं ९०,००० किलोवॅटचे चार जनरेटर्स बनविण्यांत येतील. त्यासाठीं लागणारा पाण्याचा पुरवठा भाक्रा धरणापासून घेण्यांत येईल.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

**डेक्कन जिमखाना शाखेचा रौप्यमहोत्सव**

बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेचा रौप्यमहोत्सव समारंभ शुक्रवार दिनांक २१ जानेवारी, १९५५ रोजीं सायंकाळीं ठीक सहा वाजतां फर्ग्युसन कॉलेजचे अँफि-थिएटरमध्यें श्री. बाळ गंगाधर खेर, ( माजी मुख्यमंत्री, मुंबई राज्य ) यांचे अध्यक्षतेखालीं होणार आहे.

---

**जागतिक बँकेंतून झेकोस्लोव्हाकियाला वगळलें**

झेकोस्लोव्हाकियानें गेलीं आठ वर्षे जागतिक बँकेची आपली भांडवलाची वर्गणी भरली नाहीं म्हणून तिचें बँकेचें सदस्यत्व रद्द करण्यांत आलें आहे. झेकोस्लोव्हाकियाकडून ६,२५,००० डॉलर बाकी येणें आहे. जागतिक बँकेचें सदस्यत्व रद्द झालें, कीं आपोआप इं. मो. फंडाचें सदस्यत्वहि रद्द होतें.

**टेलिफोन्सच्या संख्येंत वाढ**—भारताचे दळणवळणमंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं दरहजार लोकसंख्येमागें एक तरी टेलिफोन देण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. सध्यां देशांतील टेलिफोन्सची संख्या २,२०,००० आहे. दर १७,००० माणसांमागें एक टेलिफोन असें प्रमाण आहे. बंगलोर येथें ऑटोमॅटिक टेलिफोन एक्सचेंज खुला करतांना त्यांनीं वरील घोषणा केली.

**नवीन शेतकी कॉलेज**—जनसेवक-संघ ह्या संघटनेतर्फे मुंबई राज्यांत एक नवीन शेतकी-कॉलेज काढण्याचें प्रयत्न सुरू आहेत असें समजतें. मुंबईपासून ६० मैलावर बोरघाटाच्या पायथ्याशीं कर्जत येथें कॉलेज स्थापन करण्यांत येणार आहे.


# ☆ दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ☆

**— भांडवल —**

| | | |
|---|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | ... ... | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... ... | रु. ७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... ... | रु. ४,५०,००,००० |

**— बँकेच्या नव्या शाखा —**

**( १ ) जव्हेरी बाजार, मुंबई ( २ ) भिवंडी ( ३ ) पनवेल ( ४ ) भवानी पेठ, पुणें ( ५ ) अहमदनगर ( ६ ) श्रीरामपूर.**

खालील ठिकाणीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची व्यवस्था करण्यांत आली असून जनतेनें मौल्यवान् वस्तूंसाठीं लॉकर्सचा अगत्य उपयोग करावा.

मुख्य कचेरी—डेक्कन जिमखाना शाखा, सोलापूर ( फलटण गल्ली शाखा ), नाशिक, अहमदनगर व श्रीरामपूर.

व्यवस्थापत्रें, विश्वस्तपत्रें वगैरेंकरितां दि महाराष्ट्र एक्झिक्यूटर अँड ट्रस्टी कं. लि. कडे चौकशी करावी.

मुख्य कचेरी :
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

**चिं. वि. जोग** मॅनेजर.

## जिनसांच्या किंमतींची प्रवृत्ति

( ऑगस्ट १९३९=१०० )

| जिन्नस | कोरियापूर्वी (२४-६-५०) | मार्च १९५१ | एप्रिल १९५४ | सप्टेंबर १९५४ | नोव्हेंबर १९५४ |
|---|---|---|---|---|---|
| **१ अन्न पदार्थ** | **४०७·२** | **४१४·१** | **३८९·०** | **३६१·३** | **३३३·४** |
| १ तांदूळ | ५०१ | ५५३ | ४८६ | ४८७ | ४३५ |
| २ गहूं | ५१५ | ५९१ | ५८० | ४५९ | ४८१ |
| ३ डाळी | ३४५ | ३९१ | ३२२ | २५५ | २२७ |
| ४ चहा | ४३२ | ३८० | ५९९ | ७०० | ६६४ |
| ५ गूळ | ४८५ | ३०५ | २९६ | २७५ | १७२ |
| ६ साखर | २७८ | २९७ | ३२८ | ३०५ | २९९ |
| **२ औद्योगिक कच्चा माल** | **६९४·२** | **६५५·८** | **४७२·१** | **४१८·१** | **४४१·९** |
| १ कपास | ४४० | ४९१ | ४७२ | ४३८ | ४८० |
| २ ताग | ४७९ | १०२६ | ४२४ | ४०२ | ४५९ |
| ३ लोकर | ५९७ | ९०७ | ६७२ | ६६० | ६९० |
| ४ भुईमूग | ७४६ | ८१७ | ६१० | ४६४ | ४१२ |
| ५ अळशी | ५३९ | ६३२ | ३७५ | ३४७ | ३२८ |
| ६ एरंडी | ४८१ | ८२३ | ३६४ | ३४१ | ३११ |
| ७ कपाशीचें बीं | ४५४ | ४९४ | ४०४ | ३०६ | ३१२ |
| ८ सोर्चें | ९५४ | १०५४ | ७४५ | ७५६ | ७३९ |
| ९ मँगॅनीज | ४५२ | ५८४ | ८५५ | ५७२ | ५३४ |
| १० अभ्रक | ४१८ | ५२६ | ४२७ | २७६ | २७६ |
| ११ कातडी | ३८३ | ७०९ | ३५० | ३८१ | ४२९ |
| १२ लाख | ६९४ | १०१० | ६३६ | ९५२ | ११०४ |
| **३ अर्ध-पक्का माल** | **३६५·५** | **३८४·१** | **३५९·९** | **३५१·१** | **३६७·६** |
| १ कातडी | ३३५ | ५८६ | ३८० | ३५८ | ३७० |
| २ तेलें | ६६३ | ७१७ | ४९४ | ४५१ | ४९३ |
| ३ खनिज तेलें | १९० | १९५ | २२१ | २२१ | २२१ |
| ४ धातू | १७४ | १९० | २४० | २४० | २४० |
| ५ झिंक | ७२३ | १८८८ | ५१९ | ५५१ | ५१५ |
| ~~६ तांबें~~ | ३५८ | ४३० | ३९९ | ४०४ | ४२२ |
| **४ तयार माल** | **३४३·९** | **३९८·३** | **३८०·६** | **३७८·६** | **३७७·१** |
| १ ताग | ५६१ | १०५२ | ४३२ | ४७१ | ४६१ |
| २ कपास | ३५३ | ३८२ | ४१६ | ४१५ | ४१५ |
| ३ रेयॉन | ५९१ | ६७२ | ५४७ | ४५४ | ४४८ |
| ४ लोकर | २८३ | ३२९ | ३१३ | ३१० | ३१० |
| ५ धातू | २६९ | २७८ | ३४० | ३४० | ३४० |
| ६ रसायनें | २८१ | २८२ | २९७ | ३०० | ३०० |
| ७ रंग | २९७ | ३०५ | २९३ | २८१ | २७८ |
| **५ सर्व जिनसा** | **३९७** | **४५०** | **४०४** | **३८४** | **३७२** |

वरील तक्त्यावरून किंमतींच्या सर्वसाधारण उताराची कल्पना येईल. चहाची किंमत वाढत चाललेली स्पष्ट होईल. साखरेची किंमतहि जरा वाढतच गेलेली आहे. खनिज तेलें व धातू ह्यांच्या किंमतींत एकदम वाढ आढळते. सर्व जिनसांच्या साकल्यानें विचार केला, तर कोरियन युद्धापूर्वीच्या मानानें आतां इंडेक्स नंबर बराच खाली आलेला आहे आणि गेल्या दोन-चार महिन्यांतील घट विशेष उल्लेखनीय आहे.

## महसूलविषयक प्रकरणांचा त्वरित निकाल

### पुनर्घटना केलेल्या ट्रायब्यूनलचीं चार बेंचें राहतील

बॉंबे रेव्हेन्यू ट्रायब्यूनलची नुकतीच पुनर्घटना करण्यांत आली आहे. या ट्रायब्यूनलचें काम सर्वसाधारपणें मुंबईंत चालेल; पण बॉंबे टेनन्सी अँण्ड अॅग्रिकल्चरल लँडस् ( बॉंबे रेव्हेन्यू ट्रायब्यूनल प्रोसिजर ) च्या नव्या नियमानुसार व नव्या बॉंबे रेव्हेन्यू ट्रायब्यूनल रेग्युलेशननुसार ट्रायब्यूनलला राज्यांत कोठेंहि सोईस्कर अशा ठिकाणीं सुनावणीचें काम करतां येईल. हे नियम व रेग्यूलेशन मुंबई सरकारच्या ता. ३० डिसेंबर, १९५४ च्या गॅझेटांत प्रसिद्ध झाले आहेत. तसेंच ते मराठी, गुजराती, कन्नड व हिंदी या भाषांतूनहि प्रसिद्ध झाले असून त्यांच्या प्रती गव्हर्मेंट पब्लिकेशन्स सेल्सडेपो, इन्स्टिटयूट ऑफ सायन्स बिल्डिंग, मुंबई १ येथें मिळूं शकतील.

नव्या ट्रायब्यूनलमध्यें सेक्रेटरीच्या ऐवजीं एक रजिस्ट्रार असून ते महसूलविषयक प्रकरणांतील अपिलें, फेरतपासणीबाबतचे अर्ज वगैरे स्वीकारतील. त्यांची कचेरी बँक ऑफ इंडिया बिल्डिंग तिसरा माळा, महात्मा गांधी रोड, मुंबई १, येथें आहे. ज्या हुकुमाविरुद्ध अपील केलें असेल ते हुकूम स्थगित करण्याबाबतचे किंवा त्यांची रिव्हिजन करण्यासंबंधींचे अर्ज त्यांच्याकडे किंवा ट्रायब्यूनलचे अध्यक्ष ठरवून देतील त्या ट्रायब्यूनलच्या सभासदाकडे करावेत.

या ट्रायब्यूनलचें पहिलें अधिवेशन मुंबईंत १७ जानेवारी १९५५ रोजीं सुरू झालें. त्याचे अध्यक्ष हायकोर्टाचे रिटायर्ड जज्ज श्री. के. सी. सेन हे असून त्यावर चार बिनसरकारी व तीन सरकारी सभासद आहेत. पूर्वीच्या ट्रायब्यूनलवर फक्त एकच बिनसरकारी सभासद होता. ट्रायब्यूनलचे सरकारी सभासद तिन्ही डिव्हिजनचे डायरेक्टर ऑफ लोकल ॲथॉरिटीज हे असून बिनसरकारी सभासद पुढीलप्रमाणें आहेत:—श्री. चुनीलाल पी. शहा, बडोदें; श्री. के. एस्. गुप्ते, पुणें; श्री. एस. व्ही. हुबळी, बेळगांव आणि श्री. ए. ए. अडारकर, मुंबई. राज्यांत कोठेंहि उद्भवणारीं अपिलें व अर्ज यांची सुनावणी करण्याचा बिनसरकारी सभासदांना अधिकार देण्यांत आला आहे. तिन्ही डायरेक्टर ऑफ लोकलॲथॉरिटीज् यांचें अधिकारक्षेत्रहि सबंध मुंबईराज्य हें आहे. यापूर्वी त्यांच्या विशिष्ट डिव्हिजनपुरतेंच त्यांचें अधिकारक्षेत्र मर्यादित होतें. अशारीतीनें या ट्रायब्यूनलवर अध्यक्षांसह एकूण आठ सभासद आहेत. तेव्हां एकाच वेळीं निरनिराळया प्रकरणांची सुनावणी करण्यासाठीं ट्रायब्यूनलचीं दोन दोन सभासदांचीं चार बेंचें स्थापन करण्यांत येतील. ट्रायब्यूनलपुढें सुनावणीसाठीं आलेलीं प्रकरणें त्वरित निकालांत काढण्यासाठीं ही उपाययोजना करण्यांत येत आहे.

**नेपाळला मिळालेली अमेरिकेची मदत**—अमेरिकेकडून नेपाळला आतांपर्यंत १९,०५,००० डॉलर्स मदतीदाखल मिळाले आहेत. त्यापैकी १२,२१,३३६ डॉलर्स विकास-योजनांवर खर्च झाले. १,२९,४६७ डॉलर्स शिष्यवृत्त्या व सरकारी नोकरांचें शिक्षण यावर खर्च झाले आणि ५५,३६२ डॉलर्स अमेरिकेंतून आलेल्या तंत्रज्ञांसाठीं खर्च झाले.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९३५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.